लोकमत

आय विटनेस

# ‘आयआयएम नागपूर’चा सातवा दीक्षान्त समारंभ



आयआयएम नागपूरचा सातवा दीक्षान्त समारंभ शनिवारी पार पडला. यावेळी २५०च्या वर विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आली. यात दोन मुलींना सुवर्णपदकाने सन्मानित करण्यात आले. समारंभानंतर विद्यार्थ्यांनी आपले डिग्री सर्टिफिकेट उंचावून आनंद साजरा केला. -वृत्त/६ (छाया : मुकेश कुकडे)

लोकमत

# यशाचा मार्ग कोरताना टिकून राहणे महत्त्वाचे

## सीईओ रितेश अग्रवाल : आयआयएम नागपूरचा सातवा दीक्षांत समारंभ

लोकमत न्यूज नेटवर्क

नागपूर : यशाचा मार्ग कोरताना टिकून राहणे महत्त्वाचे आहे. तेव्हा तुम्ही कुठून आलात हे महत्त्वाचे नाही, तुम्हाला कुठे जायचे आहे यावर लक्ष केंद्रित करून झेप घ्या, असा कानमंत्र ओयो रूम्सचे मुख्य कार्यकारी अधिकारी रितेश अग्रवाल यांनी आयआयएमच्या विद्यार्थ्यांना दिला. जमिनीवर राहा आणि आपल्या मुळांना कधीही विसरू नका, असा सल्लाही त्यांनी यावेळी दिला.

आयआयएम नागपूरचा सातवा दीक्षांत समारंभ शनिवारी मिहान येथील संस्थेच्या शैक्षणिक परिसरात आयोजित करण्यात आला. त्यावेळी प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. यावेळी एचसीएल कंपनीचे संस्थापक आणि एपीक फाउंडेशनचे चेअरमन अजय चौधरी हे प्रमुख पाहुणे होते. आयआयएम नागपूर बोर्ड ऑफ गव्हर्नर्सचे चेअरमन सी. पी. गुरनानी व प्रामुख्याने उपस्थित होते.

सीईओ रितेश अगवाल म्हणाले, भारत हा लघु उद्योगांचा देश असून, या उद्योगातून नवीन उद्योजकांना खूप काही शिकण्यासारखे आहे. जगात भारत सध्या एका विशिष्ट भरारीकडे वाटचाल करीत असून, आपण त्याचा लाभ घ्यायला हवा. कृत्रिम बुद्धिमत्तेचा होणारा वापर हा लक्षणीय असून, मशीन लर्निंगबद्दल विद्यार्थ्यांनी अजून माहिती करून घ्यावी, असेही ते म्हणाले.

एचसीएल कंपनीचे संस्थापक अजय चौधरी यांनी ऑनलाइन मार्गदर्शन केले. ते म्हणाले, येत्या २०-३० वर्षांत इलेक्ट्रॉनिक क्षेत्रात नवनवीन संधी उपलब्ध होणार असून, भारताने त्या संधीचा पुरेपूर फायदा घ्यावा. भारताने आता सेमीकंडक्टर उत्पादन क्षेत्रात पुढाकार घेऊन त्यात स्वयंपूर्ण व्हावे, असे आवाहनही त्यांनी केले.



मार्गदर्शन करताना ओयो रूम्सचे मुख्य कार्यकारी अधिकारी रितेश अग्रवाल. मंचावर अजय चौधरी, सी. पी. गुरनानी, डॉ. भीमराया मैत्री आदींची उपस्थिती होती.

### वार्षिक ६४ लाखांचे आतापर्यंतचे सर्वाधिक उच्च वेतनाचे पॅकेज

आयआयएम नागपूरचे संचालक डॉ. भीमराया मैत्री यांनी संस्थेचा अहवाल सादर केला. यावेळी त्यांनी सांगितले की, मायक्रोसॉफ्ट, एचसीएल, जेपी मॉर्गन यांसारख्या बहुराष्ट्रीय कंपन्या प्लेसमेंटसाठी संस्थानच्या विद्यार्थ्यांना संधी देत असून, वार्षिक ६४ लाखांचे पॅकेज हे आतापर्यंतचे सर्वाधिक उच्च वेतनाचे पॅकेज संस्थेतील विद्यार्थ्याला मिळाले आहे. आयआयएम नागपूरने विविध आंतरराष्ट्रीय विद्यापीठासोबत सामंजस्य करार केले असून, महाराष्ट्र राज्य सरकारसोबतही कृषी क्षेत्राशी निगडित सामंजस्य करार केले आहेत.

### अर्पिता कुमारी व अनमोल अग्रवाल यांनी पटकावले सुवर्णपदक

या दीक्षांत समारंभात अर्पिता कुमारी व अनमोल अग्रवाल या विद्यार्थिनींनी सुवर्णपदक पटकावले. यावेळी एकूण २३४ एमबीए पदवींचे वितरण करण्यात आले.



अर्पिता कुमारी



अनमोल अगरवाल.